| **Headline:** Limaye takes charge as MD & CEO of NSE | |
| --- | --- |
| **Source:** Sakal | **Date:** 18 July 2017 |

# लिमये 'एनएसई'चे व्यवस्थापकीय संचालक



**विक्रम लिमये**

मुंबई, ता. १७ (वृत्तसंस्था) : राष्ट्रीय शेअर बाजाराचे (एनएसई) व्यवस्थापकीय संचालक (एमडी) व मुख्य कार्यकारीपदी (सीईओ) विक्रम लिमये यांची निवड करण्यात आली आहे. सेबी आणि 'एनएसई'च्या वार्षिक बैठकीत याबाबत मंजुरी मिळाल्यानंतर ते पदभार स्वीकारतील. २ डिसेंबर २०१६ रोजी चित्रा रामचंद्रन यांच्या राजीनाम्यानंतर 'एनएसई'चे 'सीईओ'पद रिक्त झाले होते. ५ डिसेंबर रोजी 'एनएसई'कडून नव्या सीईओच्या नियुक्तीसाठी समिती गठीत करण्यात आली होती.